**सुधारित प्रादेशिक पर्यटन विकास योजना तयार करुन अंमलबजावणी प्रभावीपणे करणे व निधी वितरित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन,**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. टीडिएस २०१०/८ /प्र.क्र.४६३/पर्यटन,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ४ नोव्हेंबर, २०१०

**वाचा :**
१) शासन निर्णय क्र. MTC १०९०/प्र.क्र.८८/पर्यटन, दिनांक २३.४.१९९०
२) शासन निर्णय क्र. MTC १०९६/प्र.क्र.५२३/पर्यटन, दिनांक ८.११.१९९६
३) शासन निर्णय क्र. MTC २००३/१२/प्र.क्र.६०४/पर्यटन, दिनांक ९.१.२००४
४) शासन निर्णय क्र. MTC २००६/६/प्र.क्र.२०/पर्यटन, दिनांक ८.९.२००६

**प्रस्तावना :** पर्यटन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात अनुक्रमांक १ ते ४ अन्वये शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत.

पर्यटन विभागाला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या "३४५२ पर्यटन" मागणी क्रमांक झेडडी -४-०१ पर्यटनांसाठी पायाभूत सुविधा-१०१-पर्यटन केंद्र" या लेखाशिर्षातर्गत उपलब्ध होत असलेल्या तरतूदीतून प्रादेशिक पर्यटन विकास योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

संदर्भ क्र. १ अन्वये या योजनेकरिता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ अन्वये राज्यातील पर्यटनस्थळांची निवड व विकास याबाबत विस्तृतपणे माहिती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये या योजनेत कोणत्या बाबींचा समावेश करण्यात यावा याबाबत नमूद करण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ४ अन्वये या योजनेचे प्रस्ताव मागविणे व त्यांची छाननी करणे आणि राज्यस्तरावर समिती स्थापन करणे, याबाबत तपशिल देण्यात आला आहे.

तथापि, या योजनेसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनास प्राप्त होत असलेल्या प्रस्तावांचे स्वरुप, लोकप्रतिनिधींच्या अपेक्षा, पर्यटकांच्या नेमक्या गरजा, अंमलबजावणी यंत्रणेची कार्यक्षमता, उपलब्ध निधीची मर्यादा पाहता, प्रादेशिक पर्यटन विकास योजनेच्या संदर्भात नव्याने सर्वसमावेशक अशी निर्णय प्रक्रिया ठरवून देणे क्रमप्राप्त झाले आहे. शिवाय या प्रक्रियेशी केंद्र सहाय्यित प्रकल्पांशी ताळमेळ घालणे आवश्यक आहे. कारण केंद्र सहाय्यित प्रकल्पात प्रकल्पातील काही कामे राज्यशासनाकडून होणे अपेक्षित आहे. शिवाय हे प्रकल्पही पर्यटन प्रकल्पासाठीच्या बृहत आराखड्याचा (मास्टर प्लॅन) भाग असले पाहिजेत.

संदर्भ क्र. २ नुसार पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी पर्यटन स्थळाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे -

| | | |
|---|---|---|
| 'अ' वर्ग | पर्यटन स्थळ | केंद्र शासन |
| 'ब' वर्ग | पर्यटन स्थळ | राज्य शासन |
| 'क' वर्ग | पर्यटन स्थळ | जिल्हा नियोजन समित्या |

'अ' श्रेणी म्हणजे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाची स्थळे, 'ब' श्रेणी म्हणजे राज्यस्तरावरील महत्त्वाची ठिकाणे आणि 'क' श्रेणी म्हणजे जिल्हास्तरावरील महत्त्वांची ठिकाणे होय. या ः सन निर्णयानुसार 'ब' श्रेणीसाठी निवड करण्यात आलेल्या ३६ स्थळांची यादी देण्यात आली आहे. 'क' श्रेणीसाठी पर्यटन स्थळाची निवड जिल्हा नियोजन समितीने करावयाची आहे व त्यासाठीची तरतूद ही जिल्हास्तरावरुनच करुन घ्यावयाची आहे.

तथापि, बदललेल्या परिस्थितीत 'अ' व 'ब' अशा प्रकारची श्रेणी असणे निरुपयोगी ठरली असून या शासन निर्णयात दिलेल्या 'ब' श्रेणीच्या ३६ स्थळांच्या यादीतील पर्यटन स्थळे पाहता अस्तित्वात असलेल्या निकषात फेरबदल करणे आवश्यक झाले आहे.

**<u>शासन निर्णय</u> :- वरील सर्व बाबींचा विचार करुन यासंदर्भातील वर नमूद केलेले सर्व संदर्भीय शासन निर्णय अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत -**

(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ हे राज्याच्या पर्यटन विकासाचा बृहत आराखडा तयार करील. हा आराखडा म्हणजे प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत पूर्ण झालेले, सुरु असलेले प्रकल्प, केंद्र शासन सहाय्यित पर्यटन प्रकल्प आणि महत्त्वाचे खाजगी पर्यटन प्रकल्प यांचा समग्र आढावा घेऊन राज्यात कोणकोणत्या ठिकाणी पर्यटन प्रकल्प उभे करण्यास वाव आहे, अशा ठिकाणांची जिल्हानिहाय व स्थळनिहाय यादी तयार करील. या यादीत पर्यटन विकासाच्या दृष्टीने कोणकोणती कामे (उदा. रिसॉर्टस, पर्यटन स्थळाकडे जाणारे जोड-रस्ते, उद्याने, वस्तुसंग्रहालय, विक्री-केंद्र, क्रीडा-सुविधा, रेस्टॉरंट बांधकाम, स्वच्छता-गृहे, दिशादर्शक फलक, वाहनतळ, संरक्षकभिंत, पर्यटकांसाठी पाणी पुरवठा, विद्युतीकरण अन्य सोयी सुविधा) घेणे आवश्यक आहे, यांचा समावेश असेल. ही यादी महाराष्ट्र प र्टन विकास महामंडळ तयार करील. राज्य शासन या आराखड्याला मंजुरी देईल.

(२) या आराखड्यातील यादीपैकी कोणती कामे केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने, कोणती कामे राज्य शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेमधून करण्यात यावी, याबाबत राज्य शासन निर्णय घेईल. जिल्हानियोजन व विकास मंडळाने बृहत आराखड्यातील कामांचा प्राधान्यक्रम ठरवावा.

(३) हा आराखडा सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविण्यात येईल. केवळ या आराखड्याच्या चौकोटीत बसणाऱ्या पर्यटन स्थळ विकास कामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून निधी देण्यात येईल.

(४) जिल्हाधिकाऱ्यांनी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेसाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल पाठविताना खालील गोष्टी सादर कराव्यात -

१. पर्यटन स्थळाचे नाव -

२. या पर्यटनस्थळी / प्रस्तावित प्रकल्पाचे / कामाचे नाव -

३. पर्यटन स्थळाची वैशिष्ट्ये -

४. बृहत आराखड्यात या स्थळाचा / कामाचा समावेश आहे काय ?

५. या स्थळाला भेट देण्याऱ्या पर्यटकांची संख्या (वार्षिक संख्या तसेच जानेवारी ते डिसेंबर अशी महिनानिहाय)

६. प्रस्तावित विकास कामांची बाबवार यादी आणि अपेक्षित खर्चांची रक्कम

७. या खर्चापैकी शासनाकडून अपेक्षित निधी व उर्वरित निधींचा स्त्रोत

८. अंमलबजावणी यंत्रणा

९. या विकास कामांकरिता जमीन उपलब्ध असल्याबाबत व ती मिळण्याची हमी तसेच अन्य आवश्यक परवानग्या असल्याचे हमीपत्र

१०. ही विकास कामे केल्यानंतर पर्यटकांच्या संख्येत होणारी अपेक्षित वाढ(वार्षिक संख्या आणि जानेवारी ते डिसेंबर अशी महिनावार)

११. विकास कामे पूर्ण केल्यानंतर उभारण्यात आलेल्या संरचनात्मक सोयींची मालकी / हक्क कोणाकडे असणार आहे, या सोयी उपयोगात आणणे, त्याची देखभाल करणे / चालविणे (Operation and Maintenance) कोण व कसा करणार आहे, यांची महसुली रचनेसह (रेव्हेन्यू मॉडेल) माहिती.

१२. ही विकास कामे BOT तत्त्वावर उभारली जाऊ शकतात का, किंवा शासनाच्या खर्चाने ती उभारल्यानंतर PPP तत्त्वावर चालवली जाऊ शकतात का, याबाबत खातरजमा केली आहे काय, याची माहिती.

अशा पर्यटनस्थळांचा विकास करण्याकरिता सार्वजनिक / खाजगी सहभाग (PPP) तत्त्वावर विकास कामे हाती घेण्यासाठी प्रामुख्याने खालील अग्रक्रमानुसार शक्याशक्यता पडताळून पाहावी -

अ. पूर्णतः सार्वजनिक खाजगी तत्त्वावर (PPP) हाती घेता येऊ शकतील अशी कामे.

ब. पूर्णतः सार्वजनिक खाजगी तत्त्वावर हाती घेता येऊ शकत नाहीत तथापि प्रकल्प वर्धनक्षम (व्हायबल) करण्यासाठी येणाऱ्या तुटीचा अर्थभरणा (viability gap funding) करुन त्याद्वारे पूर्ण करता येऊ शकतील अशी कामे.

क. वरील दोन प्रकारे घेता येऊ न शकणारी व पूर्णतः शासकीय अनुदानाद्वारे राबवावयाची कामे.

तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी नगर विकास विभाग व ग्राम विकास विभाग निधी मंजूर करीत असल्याने मंदिर, देवस्थाने, तीर्थक्षेत्रे यांच्यासाठीच्या विकास कामांसाठीचे प्रस्ताव (तीर्थक्षेत्राच्या परिसर विकासांचेसुद्धा) यापुढे प्रादेशिक पर्यटन विकास योजनेसाठी स्वीकारण्यात येणार नाहीत. तथापि, ज्याठिकाणी महाराष्ट्रात बाहेरुन मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात अशा पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा अपवाद करण्यात येईल. ते महत्त्वाचे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित होण्याची क्षमता असल्यास केवळ धार्मिक क्षेत्र म्हणून नव्हे तर पुरातन, ऐतिहासिक, निसर्गरम्य, भव्य, कलात्मक म्हणून सर्व धर्मियांसाठी आकर्षक पर्यटन स्थळ असे विकसित होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांचाच यासाठी विचार करण्यात येईल.

(५) वरीलप्रमाणे जिल्हास्तरावर पर्यटन स्थळांची निवड करणे, प्रस्ताव तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे तसेच या कामांचा सातत्याने आढावा घेणे यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती असेल -

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. विभागीय वन अधिकारी | सदस्य |
| ४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग(रस्ते) | सदस्य |
| ५. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग(इमारत) | सदस्य |
| ६. कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ७. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी | सदस्य |
| ८. कार्यकारी अधिकारी, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ९. प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | सदस्य |
| १०. जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य-सचिव |

स्थानिक पातळीवरील पर्यटन क्षेत्रातील सहभागीदार(स्टेकहोल्डर) - टूर ऑपरेटर्स, हॉटेल संघटना, पर्यटन क्षेत्रातील उद्योजक, वास्तूविशारद, इतिहास तज्ज्ञ, प्रसारमाध्यमातील अनुभवी व ज्येष्ठ मान्यवर तज्ज्ञ आदी - यांना आवश्यकतेनुसार समितीच्या बैठकीकरिता जिल्हाधिकारी मार्गदर्शनासाठी आमंत्रित करु शकतील.

(६) वरील समितीने पर्यटन स्थळांची निवड केल्यानंतर समितीने प्रकल्प अहवाल तयार करावा. हा अहवाल तयार करण्याकरिता जिल्हा पातळीवर पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ वास्तूविशारद अथवा सल्लागार उपलब्ध असतील असे नाही. यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अशा मान्यताप्राप्त सल्लागार कंपन्यांची / वास्तुविशारदांची नामसूची (पॅनल) तयार करील. या यादीतील संस्थेकडून जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकल्प अहवाल तयार करुन घ्यावा. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठीच्या मोबदल्याची रक्कम महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ठरवून देईल. ही रक्कम अदा करण्यासाठी शासन या योजनेच्या तरतूदीतून महामंडळाकडे निधी उपलब्ध करुन देईल.

(७) जिल्हास्तरावरुन आलेल्या प्रस्तावांची महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून छाननी करण्यात येईल. छाननीअंती हे प्रस्ताव राज्य पर्यटन विकास समितीपुढे संमतीसाठी मंजुरीसाठी ठेवण्यात येतील. या समितीची रचना खालील प्रमाणे असेल -

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री(पर्यटन) | अध्यक्ष |
| २. मा.राज्यमंत्री(पर्यटन) | सदस्य |
| ३. प्रधान सचिव(पर्यटन) | सदस्य |
| ४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | सदस्य |
| ६. उपसचिव(पर्यटन) | सदस्य-सचिव |

(८) वरील समितीने प्रादेशिक पर्यटन योजनेतंर्गत प्रस्तावित कामास मान्यता दिल्यानंतर शासन संबंधित जिल्हाधिकारी तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित जिल्हाधिकारी / महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देईल. संबंधित जिल्हाधिकारी / महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांना वितरीत केलेल्या निधीबाबत खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांच्या नोंदीनुसार

करुन कामाच्या पूर्णत्वाचा दाखला व निधी उपयोगितेच्या प्रमाणपत्रासह अहवाल शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

प्रशासकीय मंजुरीचे अधिकार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उपविभाग (१ ते ५) नुसार असतील.

३४५२-पर्यटन या प्रधान लेखाशिर्षाखाली राज्य योजनेंतर्गत पुढील उपलेखाशिर्षाखाली निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना

(०२)(१८) पर्यटन विकासासाठी विविध मुलभूत पायाभूत -

सुविधाकरिता अनुदान(३४५२ १९५ ८)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अजय अंबेकर)
उप सचिव, पर्यटन विभाग

प्रति,
मा. मंत्री,(पर्यटन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री,(पर्यटन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
अपर मुख्य सचिव(वित्त), मंत्रालय, मुंबई,
अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई,
सर्व विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) / नागपूर, मुंबई,
वित्त विभाग,(व्यय-१४, व्यय-८, अर्थसंकल्प-२, १०) मंत्रालय, मुंबई,
नियोजन विभाग,(१४१२, १४५२) मंत्रालय, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
निवड नस्ती(पर्यटन)

-------